पुढारी

# क्विक हिल फाऊंडेशनतर्फे मोफत लसीकरण

**वडूज : पुढारी वृत्तसेवा**

क्विक हिल फाऊंडेशन (QHF) द्वारे ललगुण ता. खटाव येथे मोफत कोव्हिड -१९ लसीकरण मोहीम पार पाडली.

क्विक हिल फाऊंडेशन, रोटरी कम्युनिटी कॉर्प्सच्या सहकार्याने ललगुणसह शेजारील ३ वाड्यांमधील नागरिकांना लसीकरण करण्यात आले. या मोफत लसीकरण मोहिमेचे उद्घाटन क्विक हिलच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर, क्विक हिल टेक्नॉलॉजीस लिमिटेडचे अध्यक्ष आणि एमडी डॉ. कैलाश काटकर यांच्या उपस्थितीत पार पडले.

यासाठी आरसीसी क्लब अध्यक्षा सौ. रजनी दीक्षित, सचिव शैला बनकर, उपाध्यक्ष राहुल घाटगे, विजय कमाने, ऋषिकेश सुतार, निलेश घाटगे, तुषार घाटगे, सरपंच जयवंत गोसावी आदींनी मोलाचे सहाय्य केले.

काटकर बाल रुग्णालयात लसीकरणासाठी अत्याधुनिक मोबाईल वाहन युनिट तैनात केले आहे. ललगुण ग्रामपंचायतीने मोहिमेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरवल्या.



'क्विक हिल'च्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांचा कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

दरम्यान, वंचित समुदायांना मोफत कोव्हिड-१९ लसीकरण प्रदान करण्याच्या मोहिमेचा एक भाग म्हणून महिन्याच्या कालावधीत लसीकरण ३ टप्प्यांत केले जाणार आहे.

My Satara Edition
Aug 31, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in